संदर्भ:—
1. NAAC, Best Practice Services April 2006, Banglore Modern library management and best practices.
२. आष्टीकर आणि कप्तान—व्यवसाय व्यवस्थापनात आणि प्रशासन प्रथम आवृत्ती १९९४, साहिल प्रकाशन, नागपूर.
३. कायंदे पाटील डॉ. गंगाधर—व्यवस्थापनाची मुलतत्वे, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक.
४. फडके द.ना.— ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे युनिर्व्हसल प्रकाशन २००७.

❑❑❑





5

# लोकसाहित्यातील लोकगीते: समुहमनाचा उत्कट आविष्कार

डॉ. वीरा पवन मांडवकर
सहायक प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ



Scanned by CamScanner

**गोषवारा :**

जनजीवनातील आणि जनमानसातील भावना, कल्पना, विचारप्रवाह, रूढी, व आदर्श यांचे दर्पण म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्य हे वेद, पुराणे, श्रुती, स्मृती, गाथा–संहिता, शास्त्रे, इतिहास आदि मान्यवर ग्रंथमंडळाच्या अग्रभागी अधिष्ठित होणारे आणि चिरंतन अशी उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्ये सिद्ध करणारे 'अलिखित अक्षर वाङमय' आहे. हे साहित्य ग्रंथबद्ध न होताही पुढच्या पिढीपर्यंत सतत संक्रमित होते. लोकसाहित्य हे लाखमोलाचा खजिना आहे. या खजिन्याचे मूळ पुरुष खेडूत बंधुभगिनी होय. त्यांच्या विविध बोली, भाषा, संस्कृती, वाक्प्रचार, शब्दसंपत्ती, ग्रामीण जनतेचे सामाजिक सांस्कृतिक व नैतिक जीवन आणि चालीरिती या सर्वांचे सम्यक दर्शन लोकसाहित्यातून उमटते. लोकसाहित्याच्या या आदिपुरुषांनी त्यांच्या नकळत एखादा साहित्यप्रकार निर्माण केला. त्यानंतर या अनवधानाने निर्माण झालेल्या साहित्यप्रकारातील आनंद लक्षात घेऊन त्यांनी विविध स्वरुपाचे प्रयोग करावयास सुरुवात केली. लोककथा, लोकनाट्य, लोकसंगीत, लोकनृत्य, लोककला हे महत्त्वाचे प्रवाह या मूळ प्रवाहात निर्माण झाले. त्याचप्रमाणे उखाणे, म्हणी, वाक्प्रचार, लोकभ्रम, लोकसमजुती, धार्मिक सामाजिक विधी इ. प्रकारांनी लोकसाहित्याचे दालन अजूनच समृद्ध झाले.

या सर्व लोकसाहित्यप्रकारांत लोकगीतांचा अत्यंत प्रगल्भ आविष्कार आपल्याला दिसून येतो. भारतात लोकगीतांची परंपरा अतिप्राचीन काळापासून प्रचलित आहे. लोकगीतांचे प्राचीनत्व समाजाच्या अस्तित्वापर्यंत नेता येते. आदिमानव जंगलात न भटकता कळपाने राहू लागला आणि समाजाची निर्मिती झाली. तेव्हापासून ही लोकगीतांची परंपरा अखंड टिकून आहे. ही मौखिक परंपरा आहे. 'ही लोकगीते म्हणजे जिवंत लोकवाणी, मानवी जीवनाच्या विविध अंगांवर मोजके पण मार्मिक भाष्य करण्यात कुशल असलेली, एकाचवेळी वाङमयानंद





देणारी व समाजदर्शन घडविणारी लोकगीते ही लोकसाहित्याचा आत्माच होय.' लोकसाहित्य तसे संपूर्ण दर्जेदार आहे पण त्यातही लोकगीतांचे स्थान वरचे आहे.

**बीजशब्द:** लोकगीते, परंपरा, सौंदर्य, शब्द, वाङमय, समुह, प्रेरणा,

**लोकगीतांची निर्मिती:**

लोकगीतांची निर्मिती ही समुहाकडुनच झाली. त्यामुळे लोकगीतांवर एखाद्या कर्त्याची छाप कधीही दिसत नाही. ती लोकसमुहाचा एक स्वाभाविक हुंकार वाटतात. सामान्य लोकांच्या मनाच्या बेभान अवस्थांतून लोकगीतांची निर्मिती होते. म्हणुनच ही निर्मिती स्वाभाविक आहे. लोकगीतांचा महत्वाचा गुणविशेष म्हणजे त्यातील सहजता. एखादा निर्झर जसा सहजपणे उतारावरून खळखळत वाहत जातो. तशा सहजप्रेरणेने आणि भावनेने लोकगीतांची निर्मिती होते. अशिक्षित रांगड्या अशा समाजात जेव्हा ज्ञानविज्ञानाचा प्रवेश झालेला नव्हता, तेव्हा तर्क बुद्धीच्या कसोटीवर न घासता अद्भुततेच्या रम्य विचारसरणीत कल्पनाविस्ताराला अधिक वाव मिळतो. तसा वरवर अडाणी वाटणाऱ्या लोकांकडे कल्पनांचा भरपूर खजिना होता. देव, दैत्य, यक्ष, किन्नर, गंधर्व, अप्सरा, पऱ्या, राक्षस, नाग इ. अतिमानवी योनी या विश्वात ते मनाने सखोल संचार करू शकत होते. त्यातुनच लोकगीतांना हे कल्पनाचे पंख लागलेले दिसतात.

**लोकगीत म्हणजे काय?**

'कोणतेही गीत अथवा संगीत लोकगीतांवर निर्भर, अधिष्ठित आहे. संगीताच्या दृष्टीने लोकगीते कसल्याही वाद्यांशिवाय स्वाभाविकपणेच हृदयस्पर्शी स्वरांचे प्रतिनिधित्व करतात. मानवजातीच्या हृदयसागरातून प्रकृतिदत्त ध्वनीने आणि सहजस्फुर्तीने प्रकट होणारे लोकगीत हे संगीतच आहे. लोकगीतांबद्दल विचार करताना अनेक अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. डॉ. सरोजिनी बाबर यांच्या मते, 'विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले



Scanned by CamScanner

व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असतानाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान् पिढ्या आपल्या नवनवोन्मेषाशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजे लोकगीत होय. के. बी. दास यांच्या मते, 'लोकगीत अशा लोकसमुहाच्या जीवनाची स्वयंस्त्रोत अभिव्यक्ती आहे जे अधिकतर आदिम अवस्थेत जीवन जगतात.' वसुदेवशरण अग्रवाल यांच्या मते, 'लोकगीत लोकसमुहाच्या संस्कृतीचे चित्र असते.' प्रा. कुंजबिहारी दास यांच्या मते, 'सभ्य आणि शिष्ट जीवनापासून दूर आणि कमीअधिक रांगड्या अवस्थेत असलेल्या लोकांची जीवनविषयक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत.

सर्व विचारवंतांनी लोकगीताबद्दल वेगवेगळी मते मांडली असली तरी त्यांचा भावार्थ हेच दर्शवितो, की नागर समाजापासून दूर राहिलेल्या या लोकगीतांनी नागर समाजाला आणि आधुनिक समाज, अभ्यासक, समीक्षक, रसिक, सर्वसामान्य जनता या सर्वांनाच वेड लावले आहे.

**लोकगीतांचे वर्गीकरण:**

लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काटेकोरपण असे वर्गीकरण होऊ शकत नसले तरी विषयाची व्यापकता, विविधता आणि सर्वसमावेशकता या निकषांच्या आधारे हे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला गेलेला आहे.

१ **प्रादेशिकता—** प्रादेशिक तत्वावर लोकगीतांचे वर्गीकरण करताना नागर विभागातील लोकगीते, दऱ्याखोऱ्यातून रानावनातून राहणारे आदिवासी, वन्यजमातींची लोकगीते याप्रकारे वर्गीकरण करता येईल.

२ **लोकगीत गाणारे —** लोकगीते म्हणणाऱ्यांवरूनही जसे स्त्रियांची लोकगीते, पुरुषांची लोकगीते असे वर्गीकरण करता येते.

३ **जातीयता —** बंजारा, गोंड, भराडी, बेलदार, मातंग अशा जातींच्या आधारे वर्गीकरण होऊ शकते.





४ **वयाची अवस्था —** बालकांची बालगीते, तरुण तरुणींची लोकगीते, म्हातारपणात म्हटली जाणारी लोकगीते असे वयानुसारही वर्गीकरण केले जाते.

५ **समाजजीवन—** समाजजीवनात काही संस्था परंपरेने चालत आलेल्या असतात, जसे भराडी, बहुरूपी, वाघ्या मुरळी, पोतराज, तुंबडीवाला, गोंधळी, वासुदेव यांनीही लोकगीतांचा वारसा जपून ठेवण्याचे कार्य केले आहे.

त्या अनुषंगानेही हे वर्गीकरण करता येते.

६ **विधी —** विविध रूढी, परंपरा, धार्मिक कार्य यांच्याशी संबंधित गीतांचे वर्गीकरण करता येते. यात जन्म, लग्न, मुंजी, मर्तिक, शेतातील विधी अशा वेगवेगळ्या कारणांसाठी लोकगीते म्हणण्यात येतात.

अशा प्रकारे जरी लोकगीतांचे वर्गीकरण करण्यात येत असले तरी त्यात काही उणीवा असू शकतात. कारण अभ्यासाच्या दृष्टीने हे क्षेत्र इतके व्यापक आहे, की काटेकोरपणे सगळी माहिती मिळणे अशक्य होते. तरीही लोकगीतांचा अंदाज येण्यासाठी हे वर्गीकरण उपयुक्त होते.

**लोकगीतांचे प्रकार:**

**१ बालकांची गाणी:**

बाळाला खेळवताना त्यांच्या आईच्या मनातील भावनाच या प्रकारच्या लोकगीतांमध्ये उतरलेल्या असतात. खेड्यापाड्यातील निरक्षर पण कल्पक आणि चतुर अशा स्त्रियांच्या कल्पनाविश्वातून साकारलेली ही बालकांची गाणी म्हणजे बालगोपाळांचे एक वेगळे भावपूर्ण रम्य असे जग आहे.. या गीतांत राधा—कृष्ण, सीता—राम, गोपी, श्रावण, लवकुश अशा नावांचा कल्पकतेने वापर केलेला असतो. बाळाच्या मांगल्याची इच्छा, त्याचे कोडकौतुक, त्याला दीर्घायुष्य लाभावे म्हणून ईश्वरास केलेली विनवणी, बाळाला झोपविण्यासाठी केलेली त्याची मनधरणी या सगळ्या भावना कुठल्याही समाज समुहाच्या मानसिकतेत



Scanned by CamScanner

सारख्याच दिसतात.यात बडबडगीते, तालगीते, नृत्यखेळगीते असे विविध प्रकार दिसतात.

**२ स्त्रियांची गाणी:**

स्त्रियांनी स्वत:चे असे सुंदर, अभिजात वाङ्मय निर्माण केलेले आहे. ओव्या, उखाणे, गाणी हे सारे स्त्री वाङ्मयच आहे. या गाण्यांमध्ये स्त्रियांचे कौटुंबिक व्यवस्थेचे चित्रण दिसते. या साहित्यात विविध प्रकारच्या ज्ञानदानाचे कार्य अखंड केल्यानेच आमच्या परंपरा, चालीरीती इ. सांस्कृतिक जीवनाच्या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश पडतो. स्त्री गीतांचेही विविध प्रकारांत वर्गीकरण करता येते.

१. श्रमगीते : दळणकांडन करताना
२. विधीगीते : लग्न मुंज, डोहाळे, मर्तिक इ. प्रसंगी म्हणावयाची गीते.
३. नृत्य खेळगीते : फुगडी, पिंगा, झिम्मा, फेराची गाणी इ.ची गीते
४. सण उत्सवाची गाणी : मंगळागौर, माडी, भोंडले, नागपंचमी, भाऊबीज, दिवाळी इ. प्रसंगी म्हणावयाची गाणी
५.· उपासना गीते : देवदेवताविषयक गाणी

**स्त्रिया आणि ओवीगीते**

ओवी ही गद्य व पद्य किंवा ग्रांथिक व गेय अशा दोन प्रकारची असते. चौथा चरण दिडका असणे हे ओवीचे वैशिष्ट्य असते. महाराष्ट्रात निर्माण झालेल्या ग्रांथिक ओव्यांची संख्या लाखांनी मोजण्याइतकी आहे. ओवी जशी ग्रंथात आहे तशी महाराष्ट्रातल्या स्त्रियांच्या तोंडीही आहे. स्त्रीजीवनात भावनांचे पाझर आणि अश्रुंचे ओघळ निर्माण करणाऱ्या लाकसाहित्यातील ओवीचे स्वरूप विविधांगी आहे. ओवी हे स्त्रियांनी बनविलेले वृत्त आहे असे एक मत मांडले जाते. स्त्रियांच्या ओवीचे वैशिष्ट्य म्हणजे ती गेय आहे, स्वाभाविक आहे, लवचिक आहे. महाराष्ट्रातल्या स्त्रियांनी पंढरी, पांडुरंग आणि संत यांच्यावर भक्तिभावाच्या विपुल





ओव्या लिहिल्या.

"आल्या जन्मामंदी। मले पंढरी पाह्याची।
पाण्यामधी माडी। माह्या कुंडलिक रायाची।।"

'रुक्ष जीवनाला सौंदर्यसंपन्न करून जगण्याची स्त्रियांची कला ओवीगीतातून व्यक्त होते. ओवीगीते हे लोकगीतातील एक वैभवसंपन्न दालन होय. त्यात विविध भावनांची अभिव्यक्ती उत्कटत्वाने झाली आहे.'

**लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्यमापन**

लोकजीवनाच्या विश्वासातून स्वयंस्फुर्तीने साकार झालेली लोकगीते वाङ्मयीन दृष्टीकोनातून श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यात जिव्हाळा, प्रेम, ऋजुता, उत्कटता, निष्ठा, प्रामाणिकपणा, उदात्त सात्विक भाव इ. वैशिष्ट्यांची रेलचेल आहे. लोकगीतातील सौंदर्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर लोकगीतातून जागोजाग प्रकट झालेली कल्पनेची भरारी फार सौंदर्यशाली आहे. उदा.

"शिवकळा, भिवकळा
नवरत्नांचा पुतळाबाई
सभेशी दोघां
तुमी रांजण, मी घागर
तुमापरीस मी नागर बाई"

लोकगीतातील भावसौंदर्य पाहिले तरी त्यात त्यांची श्रीमंती दिसते. ही गीते काव्याच्या दृष्टीने जेवढी सरस आहेत तेवढीच मानवी जीवनाची संस्कृतीरक्षक म्हणून महत्वाची मानली गेली आहेत. लोकगीतातील प्रत्येक शब्दाला भावनेचा स्पर्श झालेला दिसतो. त्यामुळेच लोकगीते जीवनस्पर्शी व हृदयस्पर्शी वाटतात.

"धरतीची गादी, पाषाणाची उशी
तुला झोप आली कैसी— मायबाई सीते
मेरूची समई, चंद्राची काडवात सीताबाई अरण्यात बाळंतीण"



Scanned by CamScanner

लोकगीतातील कल्पनासौंदर्याचा विचार करता त्यातही प्रकट झालेली कल्पनेची भरारी फार सौंदर्यशाली आहे. उपमा, दृष्टांत, कल्पनावैभव एखाद्या श्रेष्ठ कवीच्या काव्यातील कल्पनेपेक्षा निश्चितच कमी दर्जाची नाही.

"मोठे मोठे डोळे, भिवया चंद्रज्योती
सजिरा म्हणून किती...."

लोकगीतांची प्रतिमासृष्टी लोकजीवनातील असल्यामुळे त्यातूनही लोकजीवनाचा उत्कट आविष्कार पहावयास मिळतो.

'देवा नारायणा, तुझया सांगते कानात,
माझया कपाळीचे कुंकू, सांभाळ बेलाच्या पानात'

लोकगीतांमध्ये विविध प्रकारच्या रंगांचा उल्लेख त्यातही लाल, हिरवा इ. रंगप्रतिमा प्रमुख होत. कुंकू, कंबरपट्टा, चंद्र, सूर्य, नारायण, शेवंतीच्या जाळ्या, निसर्गातील प्रतिमा, तसेच भिवया, चंद्रजोती, धरती, पाषाण, शालू, चोळी, नथ अशा नानाविध प्रतिमासृष्टी लोकसाहित्यात साकारलेली दिसते. या गीतांत कृत्रिमता मुळीच दिसत नाही. म्हणुनच लोकगीते सदाहरीत दिसतात.

**निष्कर्ष:**

१. लोकगीतांची परंपरा मौखिक असून त्यांचा कर्ता अनामिक असतो. ती समुहमनाची निर्मिती असते.
२. लोकगीतांत पुरुषांच्या तुलनेत स्त्रीगीतांची संख्या विपुल प्रमाणात आढळते.
३. लोकगीतातून लोकजीवनाचा आविष्कार होतो.
४. लोकगीते नृत्य, नाट्य, खेळ, यांच्याशी अभिन्नपणे जोडली गेली आहेत.
५. लोकगीतात भाव, कल्पना, अलंकार, रस, अर्थ या दृष्टीने वाङमयीन मूल्ये असतात.
६. लोकगीतात वाद्यांच्या साथीचा अभाव असतो.





७. लोकगीतांची निर्मिती सातत्याने होत असते.
८. लोकगीते कृत्रिम सौंदर्याने नटलेली नसतात.

**संदर्भ :**

१. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम, लोकगीत: परंपरा आणि स्वरूप, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, प्रथमावृत्ती, २००७ विजय प्रकाशन नागपूर पृ.९९
२. बाबर सरोजिनी, मराठीतील स्त्रीधन, पृ.८
३. मांडे, डॉ प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप: पृ.२६३

**संदर्भग्रंथ :**

१. चोरघडे, वा. कृ.—साहित्याचे मूलघन
२. शेंडे, ना. रा.—लोककसाहित्य संपदा
३. व्हटकर नामदेव—मराठीचे लोकनाटय:तमाशा, कला आणि साहित्य

❑❑❑



Scanned by CamScanner